**ठळक बातम्या**

- दहशतवादाविरोधातल्या लढ्यात देशातली एकी हीच सर्वात मोठी ताकद असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन
- महाराष्ट्रात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांपैकी कुणीही बेपत्ता नसून त्यांना देशाबाहेर काढायची प्रक्रिया सुरू असल्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही
- राज्यात प्रत्येकाला घरापासून जवळ दर्जेदार आरोग्यसुविधा मिळावी याकरता त्रिस्तरीय यंत्रणा पुढच्या ३ ते ४ वर्षांत उभी केली जाणार

**आणि**

- महिला क्रिकेटमधे, तिरंगी एकदिवसीय क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताचा श्रीलंकेवर ९ गडी राखून विजय,

  तर

  आयपीएलमध्ये मुंबईत सुरु असलेल्या मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात लखनौ सुपर जायंट्स पराभवाच्या छायेत

**<><><><><>**

दहशतवादाविरोधातल्या लढ्यात १४० कोटी भारतीयांची एकजूट हीच सर्वात मोठी ताकद असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज 'मन की बात' या कार्यक्रमात केलं. हा या कार्यक्रमाचा एकशे एकविसावा भाग होता.

**होल्ड बाईट---- MODI DAHASHATWAD**

पहलगाम इथं पर्यटकांवर झालेल्या हल्ल्यातल्या पीडित कुटुंबांना न्याय मिळवून देण्याचं आश्वासन आणि हा हल्ला घडवणाऱ्यांना कठोर प्रत्युत्तर देण्याचा निर्धार त्यांनी आजच्या मन की बात मधून व्यक्त केला. या आव्हानाचा सामना करण्यासाठी एक राष्ट्र म्हणून प्रबळ इच्छाशक्ती दाखवून द्यावी लागेल, असं ते म्हणाले.

जगभरातल्या देशांच्या नेत्यांनी या कठीण काळात भारताला पाठिंबा दिल्याचंही त्यांनी नमूद केलं.

ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. के. कस्तुरीरंगन यांचं नुकतंच निधन झाल्याचा उल्लेख करुन प्रधानमंत्र्यांनी विज्ञान, शिक्षण आणि भारताच्या अंतराळ क्षेत्रातल्या त्यांच्या कार्याला उजाळा दिला. त्यांच्यामुळेच इस्रोला नवी ओळख आणि भारताच्या अंतराळ कार्यक्रमाला जागतिक मान्यता मिळाल्याचं मोदी म्हणाले. यानिमित्तानं प्रधानमंत्र्यांनी इसरोची कामगिरीही श्रोत्यांसमोर मांडली. एप्रिल महिन्यात आर्यभट्ट उपग्रहाच्या प्रक्षेपणाला ५० वर्षं पूर्ण झाल्याचा उल्लेख त्यांनी केला. ५० वर्षांपूर्वी मर्यादित संसाधनं असूनही भारतीय शास्त्रज्ञांनी आपली प्रतिभा, समर्पण वृत्ती आणि राष्ट्रसेवेच्या भावनेतून या क्षेत्रातली भारताची आजवरची वाटचाल घडवून आणली असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. जगभरातले अनेक देश त्यांच्या अंतराळ मोहिमांसाठी भारताची मदत घेत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट---- MODI ISRO**

भारतातर्फे इतर देशांमधे केल्या जात असलेल्या मानवतावादी मदतीची आणि मानवतेप्रती भारताची वचनबद्धताही प्रधानमंत्र्यांनी अधोरेखित केली. या निमित्तानं प्रधानमंत्र्यांनी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं तयार केलेल्या सचेत या मोबाईल ॲपविषयी देखील माहिती दिली. श्रोत्यांनी या ॲपचा वापर करावा असं आवाहनही त्यांनी केलं.

भारताचा युवा वर्ग विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाकडे वाटचाल करत असल्याची उदाहरणं त्यांनी दिली. यासोबतच देशाच्या विविध भागातल्या प्रयोगशील शेतकऱ्यांनी प्रतिकूल हवामानात विविध पिकं घेण्यासंबंधी केलेल्या प्रयोगांची माहिती त्यांनी दिली.

१०८ वर्षांपूर्वी १८५७ च्या एप्रिल आणि मे महिन्यात झालेल्या पहिल्या स्वातंत्र्य संग्रामाचं स्मरण त्यांनी श्रोत्यांना करून दिलं. यानिमित्तानं महात्मा गांधी यांच्या

नेतृत्वात चंपारण इथं झालेल्या सत्याग्रहाची गाथा त्यांनी श्रोत्यांना सांगितली. येत्या १० मे ला या पहिल्या स्वातंत्र्य संग्रामाच्या स्मृती दिनानिमित्त आपण स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रेरणा जिवंत ठेवाव्यात असं आवाहन त्यांनी श्रोत्यांना केलं.

एक पेड मां के नाम या वृक्ष लागवड मोहिमेला येत्या ५ जूनला एक वर्ष पूर्ण होणार असल्याचं सांगून मोदी यांनी आवाहन केलं, की देशातल्या नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावं.

<><><><>

महाराष्ट्रात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांपैकी कुणीही बेपत्ता नसून या सर्व नागरिकांना देशाबाहेर काढायची प्रक्रिया सुरू असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज पुण्यात बातमीदारांशी बोलताना दिली. गृहविभागाच्या आकडेवारीनुसार राज्यातल्या एकंदर ४८ शहरांमध्ये ५ हजार २३ पाकिस्तानी नागरिक राहतात. या सर्व नागरिकांना आज संध्याकाळपर्यंत किंवा उद्यापर्यंत देशातून बाहेर काढलं जाईल, असंही फडनवीस यांनी नमूद केलं.

<><><><>

पहलगामचा हल्ला हा देशाच्या आत्म्यावरचा हल्ला असून त्यावर निर्णायक पावलं उचलण्याची वेळ झाली असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज बुलढाणा इथं जाहीर सभेत सांगितलं.

पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ आजही अनेक ठिकाणी निदर्शनं करीत हल्ल्यातल्या मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. मुंबईत शिवाजी पार्क इथं एक भारत हम भारत या स्वयंसेवी संघटनेच्या वतीनं काळे फलक घेऊन पदयात्रा काढण्यात आली. ज्येष्ठ कलावंत मकरंद देशपांडे यांच्यासह अनेक मान्यवर या पदयात्रेत सहभागी झाले होते.

नाशिकमधे संभाजी ब्रिगेडच्या वतीनं पाकिस्तानचे प्रधानमंत्री शहबाज शरीफ आणि पाकिस्तानचा झेंडा छापलेले फलक जाळून निषेध नोंदवण्यात आला.

**<><><><><>**

राज्यात प्रत्येकाला घरापासून जवळ दर्जेदार आरोग्यसुविधा मिळावी याकरता त्रिस्तरीय यंत्रणा पुढच्या ३ ते ४ वर्षांत उभी केली जाणार असल्याचं मुख्यमत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज सांगितलं. छत्रपती संभाजीनगरमधे शासकीय कर्करोग रुग्णालयात ट्रू बीम युनिट या अत्याधुनिक यंत्रप्रणालीचं आणि संस्थेच्या विस्तारित भागाचं लोकार्पण आज केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते झालं, त्या कार्यक्रमात अध्यक्ष या नात्यानं ते बोलत होते. कर्करोगावर रेडिएशन उपचार आता छत्रपती संभाजीनगरमधे उपलब्ध होतील असं मुख्यमंत्री म्हणाले. राज्यात जिथं जिल्हा सामान्य रुग्णालयाचं रुपांतर वैद्यकीय महाविद्यालयात झालं आहे, तिथं वेगळं सामान्य रुग्णालय उभारलं जाईल असं त्यांनी सांगितलं.

कर्करोगविषयक उपचार आणि जागृतीवर भर दिला जात असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा यांनी दिली. निदान झाल्यावर ९० टक्के रुग्णांवर ३० दिवसात उपचार सुरु होत आहेत याची नोंद जागतिक स्तरावर घेतली गेल्याचं त्यांनी सांगितलं.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ तसंच स्थानिक खासदार, आमदार आणि लोकप्रतिनिधी तसंच वरिष्ठ शासकीय अधिकारी कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे, भारत, श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या तिरंगी एकदिवसीय क्रिकेट मालिकेत, आज श्रीलंकेत कोलंबो इथं झालेल्या पहिल्या सामन्यात भारतानं श्रीलंकेवर ९ गडी राखून विजय मिळवला.

भारतानं नाणेफेक जिंकून यजमान श्रीलंकेला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं, आणि त्यांचा डाव ३८ षटकं आणि एका चेंडूत १४७ धावांवर गुंडाळला. स्नेह राणानं ३, दिप्ती शर्मा आणि श्री चरणी यांनी प्रत्येकी दोन बळी मिळवले.

विजयासाठी १४८ धावांचं आव्हान भारतानं २९ षटकं आणि ४ चेंडूत एका गड्याच्या मोबदल्यात पार केलं. प्रतिका रावलनं नाबाद ५०, तर हरनील देओलनं नाबाद ४८ धावा केल्या. स्मृती मंधानानं ४३ धावांचं योगदान दिलं.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत, आज मुंबईत वानखेडे मैदानावर सुरु असलेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सनं लखनौ सुपर जायंट्सपुढं विजयासाठी २१६ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

लखनौ सुपर जायंट्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. मुंबई इंडियन्सनं निर्धारित २० षटकात ७ गडी गमावून २१५ धावा केल्या. रायन रिकल्टननं ५८, तर सूर्यकुमार यादवनं ५४ धावा केल्या, नमन धीरनं नाबाद २५ धावा केल्या.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा लखनौ सुपर जायंट्सच्या १६ षटकात ८ बाद १४२ धावा झाल्या होत्या.

या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू यांच्यात होत आहे. दिल्लीत, थोड्याच वेळात, साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

इस्त्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे माजी प्रमुख आणि राज्यसभेचे माजी खासदार डॉक्टर के. कस्तुरीरंगन यांच्या पार्थिवावर आज बंगळुरू इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी रामन संशोधन संस्थेत कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत, मुख्यमंत्री सिद्धरामय्या, केंद्रीय मंत्री धर्मेंद्र

प्रधान, इस्रोचे प्रमुख डॉक्टर व्ही. नारायणन यांनी कस्तुरीरंगन यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेतलं.

**<><><><><>**

लष्कराचे माजी उपप्रमुख आणि बॉम्बे सॅपर्सचे कर्नल कमांडंट लेफ्टनंट जनरल एस पट्टाभिरामन यांच्या पार्थिवावर आज लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. कोकणात काही ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ झाली. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान परभणी इथं ४४ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

**//<><><><><>//**